# NRI असतानाचे काही अनुभव

**मी लॉफ्टमध्ये चढून गेलो पण तेथील फरशी म्हणजे लाकडी बोर्ड होते. त्यांच्यावर पाय देण्याऐवजी त्यांना आधार देणाऱ्या वाशांवर (Beams) पाय ठेवायला हवे होते. त्या चुकीचा परिणाम म्हणजे माझे पाय बोर्डात भोक पाडून खाली गेले.**

**मी** सप्टेंबर १९५७ ते सप्टेंबर १९७२ हा १५ वर्षांचा कालखंड केंब्रिज, इंग्लंड येथे काढला. त्या काळातले हे दोन प्रसंग.



१९५९ च्या उन्हाळ्यात भारतीय क्रिकेट टीम इंग्लंडचा दौरा करत होती. भारत-इंग्लंड टेस्ट मॅच एखादा दिवस प्रत्यक्ष मैदानावर हजेरी लावून पाहावी असे मला वाटत होते. माझी परीक्षा संपल्यावर दुसरी टेस्ट मॅच पाहायला लॉर्डस् मैदानाकडे जायचे मी ठरवले व त्यासाठी एक सूर्यप्रकाशित दिवस निवडला. सकाळची ट्रेन पकडून लंडनला गेलो आणि पावणेअकरा वाजता लॉर्डस् गाठले. मॅच अकरा वाजता सुरू व्हायची होती.

मी आगाऊ तिकीट काढले नव्हते. मैदानाबाहेर मी तिकिटाची खिडकी शोधायला सुरुवात केली. ती सहजासहजी सापडेचना, तेव्हा पोलिसांकडे गेलो आणि तिकीट कुठे मिळेल अशी चौकशी केली. त्याने मला न्याहाळून प्रतिप्रश्न केला. 'तुम्ही भारतातले का?' मी होकारार्थी उत्तर दिले, तेव्हा त्याचा दुसरा प्रश्न 'तुम्ही विद्यार्थी आहात का?' मी होय म्हटले तेव्हा त्याने आपल्या पॅंटच्या खिशातून एक तिकीट काढून मला दिले आणि म्हणाला, 'एका सद्गृहस्थाने हे तिकीट आजच मला दिले. त्यांना काही कामामुळे आज मॅच पाहता येत नाही. तेव्हा त्यांनी हे तिकीट एखाद्या भारतीय विद्यार्थ्याला भेट म्हणून देण्यासाठी माझ्या हवाली केले आहे... तेव्हा 'Have a good day on the ground' योगायोग! तिथे अनेक पोलिस होते; पण मी निवडलेल्या पोलिसाकडून मला ही अनपेक्षित भेट मिळाली.

केंब्रिजमध्ये आम्ही घर विकत घेतले, त्यातील स्वयंपाकघराच्या सिंकमध्ये दोन नळ होते. एकातून गार तर एकातून गरम पाणी येण्याची सोय होती. पण त्याऐवजी 'मिक्सर टॅप' म्हणजे गार व गरम पाणी योग्य प्रमाणात मिसळण्याची सोय असावी असे वाटले. घर घेतल्यापासून मी 'Do It Yourself' चे धडे घ्यायला सुरुवात केली होती. तेव्हा हे काम स्वत:च करायचे मी ठरवले. पण त्यासाठी तिकडे येणारे पाणी बंद करणे आवश्यक होते. ते बंद करायची तोटी होती लॉफ्टमध्ये.

मी लॉफ्टमध्ये चढून गेलो पण तेथील फरशी म्हणजे लाकडी बोर्ड होते. त्यांच्यावर पाय देण्याऐवजी त्यांना आधार देणाऱ्या वाशांवर (Beams) पाय ठेवायला हवे होते. त्या चुकीचा परिणाम म्हणजे माझे पाय बोर्डात भोक पाडून खाली गेले. कसाबसा सावरून, पाणी बंद करून मी नळ बदलायचे काम पुरे केले. पण हा अव्यापारेषू व्यापार निस्तरायला लॉफ्टची फरशी दुरुस्त करणे आले.

माझ्या 'DIY' ची पोच हे काम करण्याइतपत नव्हती. एका व्यावसायिक माणसाला कामाचे एस्टीमेट विचारले. तेव्हा त्याचा आकडा ४० पाउंड (१९६८ मध्ये) ऐकून मी हादरलो. पण माझ्या एका शेजाऱ्याने सांगितले की पलीकडच्या गल्लीतले एक म्हातारबुवा आता निवृत्त झालेत आणि गंमत म्हणून अशी कामे करतात.

मी म्हातारबुवांना बोलावले. त्यांनी काही खिळे ठोकून सर्व काही व्यवस्थित करून दिले. मी किंमत विचारली तेव्हा हसून म्हणाले, 'नंतर सांगेन'. त्यानंतर तीन चार वेळा विचारले तेव्हा दरवेळी त्यांनी हेच उत्तर दिले.

तो 'नंतर' कधी उगवलाच नाही.

■*जयंत नारळीकर, नृपो सदस्य*